केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना सन २०११-१२
मध्ये राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र.एसडीआय - १६११/प्र.क्र. ६५/४-अे,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२,
दिनांकः ११ जानेवारी, २०१२.

संदर्भः- १. नियोजन विभाग शासन निर्णय क्र.जीवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४ दि. १६ फेब्रुवारी २००८
२. शासन पत्र क्र.एसडीआय-१६१०/सीआर-६५/४-अे, दि.२८ मार्च,२०११
३. केंद्रिय कृषि मंत्रालय नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ११-१/२०११-हॉर्ट दिनांक :- २६ मे,२०११

प्रस्तावना :-

राज्यातील शेती प्रामुख्याने मौसमी पावसावर अवलंबून आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये दिवसेंदिवस होत असलेली घट आणि पावसाचा अनियमितपणा यामुळे उपलब्ध पाण्याच्या साठयाचा काटकसरीने आणि नियोजनबध्द वापर करण्याकरीता ठिबक व तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब करणे अपरिहार्य आहे. यासाठी सन २००५-२००६ पासून राज्यात केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत फलोत्पादन व बिगर फलोत्पादन पिकांकरिता सुक्ष्म सिंचन संचांसाठी अल्प व अत्यल्प भूधारक शेतक-यांना ६० टक्के दराने व सर्व संवर्गातील शेतक-यांना ५० टक्के दराने अनुदान देय आहे. यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा ८० टक्के व राज्य शासनाचा हिस्सा २० टक्के आहे. सन २०११-१२ मध्ये राज्यामध्ये ही योजना राबविण्याकरिता एकूण रुपये १११५८६.६३ लाख रकमेचा वार्षिक कृति आराखडा संदर्भ क्रमांक २ अन्वये शासनस्तरावरुन केंद्र शासनास सादर करण्यात आलेला होता. केंद्र शासनाने सन २०११-१२ मध्ये ही योजना राबविण्याकरिता संदर्भ क्रमांक ३ येथील पत्रांन्वये यापैकी रुपये २३२८०.०० लाख केंद्र हिस्सा मंजूर केलेला आहे. या अनुषंगाने या योजनेकरिता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना सन २०११-१२ मध्ये राबविण्याकरीता केंद्र शासनाने केंद्र हिश्श्याच्या रु. २३२८०.०० लाख (रू. दोनशे बत्तीस कोटी ऐंशी लाख फक्त)रकमेची मान्यता दिलेली आहे. सदरची योजना ८०:२० तत्वावर राबविण्यात येत असून त्यास पूरक राज्य हिस्सा रुपये ५८२०.०० लाख (रू.अठ्ठावण्ण कोटी वीस लाख फक्त)मिळून एकूण रुपये २९१००.०० लाख (दोनशे एक्याण्णव कोटी फक्त) निधीच्या कार्यक्रमास शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सन २००८-०९ पासून राज्य हिश्श्याचा निधी जिल्हयाचे जिल्हा नियोजन समितीमार्फत वितरीत करण्यात येत आहे. याबाबतची सुधारीत कार्यपध्दती राज्य शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. जीवायो-१००७/प्र.क्र.३९/का-१४४४ दिनांक १६ फेब्रुवारी २००८ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. सदरहू शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी योजनेची अंमलबजावणी करावी.

केंद्र शासन व जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग हा वर्ष २०१०-११ पर्यंत बसविलेल्या प्रलंबित प्रकरणांसाठी करण्यात यावा. प्रलंबित प्रकरणांची रक्कम अदा करीत असताना प्रथमतः विदर्भ मराठवाडा विभागातील अनुशेष विचारात घेवून तेथील प्रकरणांसाठी प्रथम प्राधान्याने निधी उपलब्ध करुन द्यावा व नंतर इतर जिल्हयांसाठी आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

सदर योजनेतंर्गत सन २०१०-११ पर्यंतच्या प्रलंबित प्रस्तावाना अनुदान अदा करण्यापूर्वी, सुक्ष्म सिंचन संच लावण्यात आले आहेत काय, याबाबत जिल्हातंर्गत आंतरसंभागीय पथकाकडून १०० टक्के प्रकरणांमध्ये पुर्नपडताळणी (Cross Verification) करण्यात यावी. कोणत्याही प्रकरणात सुक्ष्म सिंचन संच उत्पादकाकडून शासनाची अथवा शेतकऱ्याची फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदर अनुदान वाटप तंतोतंत केद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच करण्यात यावे. केंद्र व राज्य शासनाने राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन योजना संदर्भात जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील अनुदानाच्या विकल्पानुसार निधीच्या वितरणबाबतची कार्यवाही करण्यात यावी. केंद्र शासनाचे मानक (Norms) डिसेंबर, २०१० मध्ये प्राप्त झाले असल्याने, संचाचे दर केंद्र शासनाच्या २००९-१० च्या मानकाप्रमाणेच राहतील, तसेच अनुदानाचा दर सन २००९-१० च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणेच सर्व शेतक-यांसाठी ५० टक्के राहिल.

केंद्र शासनाकडून उपलब्ध असणा-या निधीच्या प्रमाणातच राज्य हिश्श्याचा निधी जिल्हा नियोजन व विकास मंडळामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावा.

केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजनेकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून त्यानुसार या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्ह्यात करणेसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याकरीता संचालक (फलोत्पादन) महाराष्ट्र राज्य पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. अनुदान वाटपाची कार्यवाही चालू आर्थिक वर्षातच पूर्ण करण्यात यावी.

केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजनेकरीता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून त्यानुसार या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्ह्यात करण्याकरीता, सूक्ष्म सिंचन उत्पादकांची नोंदणी करण्याकरीता व क्षेत्रिय कार्यालयाकरिता आवश्यक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याकरीता संचालक (फलोत्पादन) महाराष्ट्र राज्य पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून दिला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०११७०५०५२५१२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्रीरंग वि. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

प्रधान सचिव, जलसंपदा विभाग मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव,(ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे
व्यवस्थापकीय संचालक, कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, आरे, दुग्ध कॉलनी गोरेगाव (पूर्व), मुंबई
सहसचिव, कृषि मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली (पत्राने)
कुलगुरु, सर्व कृषि विद्यापीठे
महाव्यवस्थापक संचांलक,नाबार्ड, मुंबई
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, राज्य अग्रणी बँक (बँक ऑफ महाराष्ट्र) पुणे
संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे
संचालक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण यंत्रणा,पुणे
तांत्रिक संचालक, राष्ट्रीय माहिती केंद्र, पुणे
सर्व संचालक/सहसंचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
जिल्हाधिकारी (सर्व) तथा अध्यक्ष, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा(आत्मा)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
संशोधन संचालक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर
संशोधन संचालक, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
संशोधन संचालक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी
प्रिन्सीपल इन्व्हेस्टिगेटर, प्रिसिजन-फार्मिंग डेव्हलममेंट सेंटर- म.फु.कृ.वि. राहूरी,
अध्यक्ष,इरिगेशन असोसिएशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य,
अध्यक्ष, महाड्रीप, पुणे
व्यवस्थापकीय संचालक जिल्हा अग्रणी बँक द्वारा (बँक ऑफ महाराष्ट्र) लोकमंगल,पुणे
राज्यस्तरीय फलोत्पादन पीक उत्पादन संघ/ जिल्हा पीक उत्पादन संघ द्वारा
विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य वित्त व लेखाधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
नियोजन विभाग/वित्त विभाग /ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, कृषि व पदुम विभाग (कृषि व फलोत्पादन)
मा. मंत्री (कृषि/फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (कृषि/फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
निवडनस्ती.